



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १३३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२६ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पवार काका पुतण्याची एक चाल अन् मविआमध्ये गोंधळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात पडद्यामागे प्रचंड राजकीय घडामोडी सुरु आहेत. पुणे महापालिका निवडणुकीत कुणाची युती आणि कुणाची आघाडी होईल? याकडे सर्वांचं लक्ष आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत एकत्र निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे पुण्यात दोन्ही पक्ष एकत्र निवडणुकीला सामोरं जाण्याची शक्यता आहे.



त्यामुळे त्यांचा प्रश्न सुटला. तसेच निवडणुका जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात भाजपची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत युती होईल, असं जाहीर केलं होतं. पण इथे जागावाटपावरुन शिवसेना आणि भाजपचं पूर्णपणे ठरलेलं नाही. तर दुसरीकडे महायुतीतला तिसरा घटकपक्ष फडणवीसांच्या घोषणेनंतर एकटा निवडणुकीला सामोरं जाणार असल्याची माहिती समोर आली. पण यानंतर वेगळ्या घडामोडी पुण्यात घडताना दिसल्या.

पुणे जिल्हा आणि अजित पवार यांचं वेगळं नातं आहे. ते पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री देखील आहेत. त्यांचा तो बालेकिल्ला आहे. असं असलं तरी भाजप आणि शिंदेंची शिवसेना हे एकत्र निवडणूक लढणार असल्याने अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पुढे मोठं चॅलेंज आहे. अशा काळात आपल्या समविचारी पक्षांना सोबत घेणं हा या पर्यायाचा अजित पवारांची राष्ट्रवादी विचार करु लागली. यातूनच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा समोर आली. हीच चर्चा आगामी काळात खरी होण्याची शक्यता मानली जात आहे. याबाबत थेट घोषणा होऊ शकते किंवा दोन्ही राष्ट्रवादींमध्ये परस्पर सहमतीने उमेदवार दिले जाऊ शकतात, अशी चर्चा समोर आली.

एकीकडे या दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा समोर आल्याने महाविकास आघाडीत मोठा गोंधळ उडताना बघायला मिळाला. विशेष म्हणजे ठाकरे बंधू तर एकत्र येताना दिसत आहेत. त्यांची पुण्यातही युती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाचे नेते आणि पदाधिकारी विचारात पडले. आघाडीत लढायचं की स्वतंत्र लढायचं याबाबतचं द्वंद्व काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांमध्ये होता. विशेष म्हणजे अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत निवडणूक लढण्यास विरोध करणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्याने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढणार असल्याचं जवळपास फिक्स असल्याची चर्चा आहे. पण त्याची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. यानंतर आता काँग्रेसनेदेखील मोठा निर्णय घेतला आहे.

**काँग्रेसचा मोठा निर्णय काय?**

पुणे महापालिका निवडणूक स्वबळार लढवायची, असा निर्णय आता काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी घेतला आहे. काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी काँग्रेस पुणे महापालिका स्वबळावर लढणार असल्याची माहिती दिली. पक्षश्रेष्ठींचा निरोप आला आहे, पुण्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी युती करू नका. ठाकरे आणि इतर कोणी येत असेल तर चर्चा करा. मात्र अजित पवारांशी युती करू नका, अशी माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी दिली. काँग्रेसच्या या निर्णयाने आता अजित पवार आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या युतीचा मार्ग मोकळा झाल्याचीदेखील चर्चा आता शहरात होऊ लागली आहे.

समविचारी पक्षांना सोबत घेऊन पुणे महापालिकेची निवडणूक लढवणार आहोत. त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत आम्ही आघाडी करणार नाहीत. शिवसेनेसोबत युती आघाडीसंदर्भात चर्चा सुरू आहे. ठाकरेंनी त्यांच्या कोट्यातून मनसेला जागा द्याव्यात असा प्रस्ताव दिला आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी 'महाराष्ट्र टाइम्स ऑनलाइन'शी बोलताना दिली आहे.

## जवळा मुरार येथील एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील जवळा मुरार येथे अत्यंत धक्कादायक घटना घडली असून या गावांतील एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दोन मुलांनी रेल्वेखाली उडी मारून आपलं आयुष्य संपवलं तर त्यांचे आई-वडील घरात मृतावस्थेत आढळले. त्यामुळे या घटनेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मुदखेड तालुक्यांतील जवळा मुरार गावांत राहणाऱ्या लखे कुटुंबातील ही घटना आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचं वातावरण आहे. एकाच कुटुंबातील चार जणांच्या आयुष्याचा अशा धक्कादायक पद्धतीने अंत झाल्यानें अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या चौघांनी आत्महत्या केली की काही घातपात झालाय, याविषयी पोलिसांचा तपास सुरू आहे.



नेमकं काय घडलं?

नांदेडच्या मुदखेड तालुक्यांतील जवळा मुरार गावांत एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर जवळा मुरार गावात पोलिसांचा मोठा बंदोबस्त पहायला मिळतोय. एकाच कुटुंबातील चौघांच्या मृत्यूमागील कारण काय आहे, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. बजरंग रमेश लखे वय २२ वर्ष आणि उमेश रमेश लखे वय २५ वर्षे या दोन सख्ख्या भावांनी मुगट रेल्वे स्थानक परिसरात रेल्वेखाली उडी मारून आपलं आयुष्य संपवलंय. तर दुसरीकडे त्यांचे वडील रमेश होनाजी लखे वय ५१ वर्ष तर आई राधाबाई रमेश लखे वय ४४ वर्ष हे दोघे त्यांच्या घरात मृतावस्थेत आढळले. मोठा मुलगा उमेश लखे हा मनसेचा मुदखेडचा माजी तालुका उपाध्यक्ष असल्याची माहिती समोर येत आहे. तर सामाजिक कार्यातही उमेशचा सक्रिय सहभाग होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बजरंग, उमेश, रमेश आणि राधाबाई लखे या चौघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या चौघांचे कोणाशी वाद होते का, कौटुंबिक वादातून असं टोकाचं पाऊल उचललंय का किंवा त्यांचा घातपात झालाय का, याचा तपास पोलीस करत आहेत. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी डि.एस.पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी डॅनियल बेन,नायब तहसीलदार मारोती जगताप,पोलिस निरीक्षक दत्तात्रय मंठाळे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बुक्तरे यांनी तासभर जवळा मुरार येथे घटनेची माहिती घेतली फॉरेंसिक लॅबही घटनास्थळी हजर होती अशी घटना पहिल्यांदाच घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## नांदणी आरटीओ चेक पोस्टवर जालन्याच्या अँटी करप्शनची धाड

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२५, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी आरटीओ चेक पोस्टवर अँटी करप्शन ब्युरो कडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. जालन्या येथील एसीबी पथकाने अचानक धाड टाकत सोलापूरचे दोन अधिकारी अटकेत घेतल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, नांदणी चेक पोस्टवर कार्यरत असलेल्या दोन आरटीओ अधिकाऱ्यांवर लाचखोरीचे गंभीर आरोप होते. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर जालन्याच्या एसीबी पथकाने सापळा रचत ही कारवाई केल्याचे समजते. कारवाईदरम्यान आवश्यक कागदपत्रे, रोकड व इतर पुराव्यांची तपासणी करण्यात आली आहे. या कारवाईमुळे नांदणी चेक पोस्टवरील कथित गैरप्रकार पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून, वाहनचालकांकडून होणाऱ्या बेकायदेशीर वसुलीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एसीबीकडून पुढील चौकशी सुरू असून, या प्रकरणात आणखी नावे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या घटनेबाबत अधिकृत माहितीची प्रतीक्षा असून, अटक केलेल्या अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे समजते. नांदणी आरटीओ चेक पोस्टवरील कारभार किती पारदर्शक आहे, याबाबत आता गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

## अखेर प्रतीक्षा संपली! नवी मुंबई विमानतळावरुन पहिलं टेकऑफ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, नवी मुंबई :** नाताळच्या मुहूर्तावर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमनतळावरून अखेर आज, गुरुवारी विमानोड्डाणास सुरुवात झाली आहे. या विमानतळावरून सकाळी ८.४० वाजता हैदराबादसाठी पहिल्या विमनाने उड्डाण केलं आहे. दिवसभरात ३० विमानोड्डाणे होणार आहेत.



नवी मुंबई विमानतळाचे अडीच महिन्यांपूर्वी उद्घाटन झाल्यानंतर या विमनतळावरून प्रत्यक्षात प्रवास करण्याची प्रतीक्षा संपली आहे. या विमानतळावर इंडिगोचे बंगळुरूहून येणारे पहिले विमान सकाळी ८ वाजता उतरेल. त्यानंतर इंडिगोचे विमान ८.४० वाजता हैदराबादकडे झेपावले. अकासा एअर, एअर इंडिया एक्स्प्रेस, स्टार एअर यांची विमानेही पहिल्या दिवशी सेवेत असणार आहेत.

पहिल्या दिवशी सुमारे चार हजार प्रवासी या विमानतळावरून प्रवास करतील. त्यांच्या स्वागतासाठी विमनतळ व्यवस्थापकांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी प्रवासादरम्यान विमानतळावर आणि विमानातही प्रवाशांना भेटवस्तू, बक्षिसे दिली जाणार आहेत.

पहिल्या दिवशी नवी मुंबई ते गोवा, कोची, बेंगळुरू आणि हैदराबाद अशी विमानसेवा असणार आहे. विमानतळ व्यवस्थापनाबरोबरच काही विमान कंपन्यांकडूनही प्रवाशांच्या स्वागतासाठी विशेष योजना आखण्यात आली आहे. त्यामुळे हा प्रवास प्रवाशांसाठी सुखद धक्का देणारा ठरेल, असा विश्वास अदानी विमानतळ समूहाचे संचालक जीत अदानी यांनी व्यक्त केला.

दरम्यान, नवी मुंबईतून विमनतळाकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांची डागडुजी, साफसफाई करण्यात आली आहे. विमानतळ परिसरातही चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील ग्रीनफिल्ड विमानतळ आहे. या विमानतळावरील पहिला प्रवास सर्व प्रवाशांच्या लक्षात राहावा, यासाठी विमानतळ प्रशासनाच्या वतीने विशेष योजना आखण्यात आल्या आहेत. प्रवाशांच्या स्वागतासाठी पाच वेगवेगळ्या ठिकाणी पाच गोष्टी प्रवाशांना आश्चर्यचकित करतील, असे सांगण्यात येते. या प्रवासादरम्यान विमनतळावर आणि विमानातही प्रवाशांना वेगळ्या भेटवस्तू, बक्षिसे दिली जाणार आहेत. कमळाच्या आकाराचे हे आकर्षक विमानतळ असून, विमानतळाच्या आतील रचनाही अत्याधुनिक पद्धतीने करण्यात आली आहे. इथे महाराष्ट्राची सांस्कृतिक प्रतिमाही पाहायला मिळणार आहे असे व्यवस्थापकांनी सांगितले.

## भरधाव वाहनाची बैलगाड्यांना धडक, २०० फूट फरफटत नेलं

### १४ जण गंभीर जखमी; बीडमध्ये भीषण अपघात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, बीड :** आष्टी तालुक्यातील शेंडगेवाडी (सावरगाव गड) येथील ऊसतोडणी कामगारांच्या बैलगाड्यांना आज पहाटे एका भरधाव वाहनाने भीषण धडक दिली. या हृदयद्रावक घटनेत १४ कामगार गंभीर जखमी झाले असून, एका बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर पाच बैल गंभीर जखमी झाले आहेत. वृद्धेश्वर साखर कारखाना (पिंपळगाव कासार) येथे ऊसतोडणीसाठी हे कामगार आपल्या बैलगाड्यांसह जात होते.

आज गुरुवारी पहाटे ६ वाजेच्या सुमारास तिसगाव-शेवगाव रस्त्यावर समोरून येणाऱ्या एका वाहनाने अचानक आपला ट्रॅक सोडून विरुद्ध दिशेला येत असलेल्या बैलगाड्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बैलगाड्या सुमारे २०० फूट लांब फरफटत गेल्या.




**१४ जण गंभीर जखमी !**

या अपघातात एकूण १४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी पूजा नाना शेंडगे (वय ३०) आणि शरद शेंडगे (वय ४०) यांची प्रकृती चिंताजनक असल्यानं त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील इंपल्स हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं आहे. उर्वरित १२ जखमींवर तिसगाव येथील श्री. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यामध्ये अभिषेक मरगळ, विशाल मरगळ कोमल ठेंगल, राणी ठेंगल, अशोक ठेंगल सीमा शेंडगे, संगीता शेंडगे, बबन शेंडगे, लिलाबाई शेंडगे, आदित्य शेंडगे, तुळजाई शेंडगे आणि राणी गोल्हार बहुतेक जखमींना गंभीर स्वरूपाचे फ्रॅक्चर आणि अंतर्गत जखमा झाल्या आहेत.

**आमदार सुरेश धस यांची तत्परता...**

घटनेची माहिती मिळताच आमदार सुरेश धस यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून रुग्णवाहिका आणि मदतीची व्यवस्था केली. आ. धस यांनी रुग्णालयात जाऊन डॉक्टरांशी चर्चा केली आणि जखमींच्या कुटुंबियांना धीर दिला. घटनेनंतर पोलीस अधिकारी केदार स, पालवे आणि पाथर्डी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक पुजारी साहेब यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. आमदार सुरेश धस यांनी दोषी वाहनचालकावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. या अपघातामुळे ऊसतोडणी कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.




## केरळमधील तिसरा कोन

केरळच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राजधानी तिरुअनंतपुरम महानगरपालिकेचा निकाल हा राज्याच्या राजकारणातील एक ऐतिहासिक वळण ठरला आहे. ९ डिसेंबर २०२५ रोजी मतदान झालेल्या या निवडणुकीत भाजपने पहिल्यांदाच राजधानीच्या महापालिकेवर कब्जा मिळवला. १०१ वार्डांच्या या महापालिकेमध्ये भाजपने ५० जागा जिंकल्या, तर सत्ताधारी माकपच्या नेतृत्वाखालील 'एलडीएफ'ला फक्त २९ आणि काँग्रेस नेतृत्वाखालील 'यूडीएफ'ला १९ जागा मिळाल्या. दोन वार्ड अपक्षांनी जिंकले. गेल्या ४५ वर्षांपासून 'एलडीएफ'च्या ताब्यात असलेल्या या महापालिकेत भाजपचा विजय हा केवळ स्थानिक पातळीवरचा बदल नाही, तर केरळच्या राजकारणात तिरंगी लढतीचा नवा आराखडा दाखवतो. तिरुअनंतपुरम निकालाच्या पार्श्वभूमीवर भाजपसाठी केरळचा सत्तामार्गाचा दरवाजा थोडा किलकिला झाला आहे. या निकालानंतर भाजपकडे महापौरपद येण्याची शक्यता आहे. आर. श्रीलेखा यांचे नाव चर्चेत आहे.

या निकालाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे काँग्रेस आणि माकप यांच्यातील जुना वाद आणि परस्परांवरील टीका यातून भाजपला थेट फायदा झाला. राज्यात एकूणच यूडीएफने चांगली कामगिरी केली. सहा महापालिकांपैकी चार (कोल्लम, त्रिशुर, एर्नाकुलम आणि कन्नूर) जिंकल्या, तर एलडीएफला फक्त कोळिकोड मिळाले, पण तिरुअनंतपुरममध्ये मात्र एलडीएफ आणि यूडीएफ अशी दोघांची मतविभागणी झाल्याने भाजपला बहुमत मिळाले. २०२० च्या निवडणुकीत भाजपला ३३ वॉर्ड मिळाले होते, तर या वेळी त्यांनी १७ वॉर्डांची वाढ करत ५० पर्यंत मजल मारली. एलडीएफचे वॉर्ड ५२ वरून २९ वर खाली आले, तर यूडीएफचे १० वरून १९ पर्यंत वाढले तरी ते अपुरे पडले.

भारतीय राजकारणात नवा पर्याय निर्माण करून देण्याची केरळ राज्याची ही पहिली वेळ नाही. याची सुरुवात १९५७ सालीच झाली होती. तेव्हा केरळमध्ये निवडणुकीद्वारे सर्वप्रथम कम्युनिस्ट पक्ष सत्तेवर आला होता. आज त्या घटनेला ६८ वर्षे पूर्ण होत असताना त्याच केरळच्या तिरुअनंतपुरम महानगरपालिकेत भाजप सत्तेवर येत आहे आणि ही 'यूडीएफ' आणि 'एलडीएफ' या दोन्ही आघाड्यांकरता धोक्याची घंटा आहे. 'राजकीय सत्ता बंदुकीच्या नळीतूनच निर्माण होते,' या माओ झेडाँगच्या प्रसिद्ध विधानाला केवळ एका दशकात खोटं ठरवत केरळने कम्युनिस्ट मतपत्रिकेद्वारे राजकीय सत्ता काबीज करू शकतात, हे जगाला दाखवून दिलं होतं. ई. एम. एस. नंबुद्रीपाद यांचे केरळमधील साम्यवादी सरकार २८ महिने सत्तेवर राहिल्यानंतर ३१ जुलै १९५९ रोजी बरखास्त केले गेले. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ३१ जुलै १९५९ रोजी संविधानाच्या अनुच्छेद ३५६ चा वादग्रस्त वापर करून सरकार बरखास्त करण्याची ती पाहिली वेळ होती. त्यावेळी पक्षाध्यक्ष होत्या त्यांच्या कन्या इंदिरा गांधी! राज्य सरकारे बरखास्त करण्यासाठी अनुच्छेद ३५६ चा वापर करण्याची एक वादग्रस्त प्रथा सुरू झाली, ज्यामुळे भारतीय संघराज्यावर दूरगामी परिणाम झाला. तिरंगी लढती नेहमी भाजपच्या पथ्यावर पडून भाजप हळूहळू सत्तेच्या जवळ पोहोचत शेवटी संपूर्ण सत्ता हस्तगत करतो, हा राम मंदिर आंदोलन सुरू झाल्यानंतर १९८९ पासून झालेल्या सर्व निवडणुकांचा इतिहास! आज भाजप देशातील सर्वात मोठा पक्ष आहे, तर काँग्रेस, डावे एकत्र येऊन सुद्धा देशात आणि अनेक राज्यांत भाजप आघाडीवर आहे. भाजपकरता केरळ आणि तमिळनाडू हे द फायनल फ्रंटियर आहेत. २०२६ मध्ये होऊ घातलेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत तिरंगी लढतींचा फायदा घेत भाजप आपलं अस्तित्व सिद्ध करू शकतो. सध्या डाव्या आघाडीकडे ९९ तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीकडे ४१ आमदार आहेत. १४० आमदारांच्या विधानसभेत सध्या तरी भाजपला जागा नाही; पण हे चित्र येऊ घातलेल्या निवडणुकीत बदलू शकते. सध्या भाजपला रोखण्यासाठी काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्यात दिलजमाई होण्याची सुतराम शक्यता नाही. बंगालमध्ये काँग्रेस आणि कम्युनिस्ट तेव्हाच एकत्र आले, जेव्हा त्यांची जागा तृणमूल काँग्रेस आणि भाजपने व्यापली होती. तशी अवस्था आज तरी केरळमध्ये नाही. देशात केरळ वगळता सर्वत्र काँग्रेस आणि कम्युनिस्ट एकत्रित राहून भाजपला विरोध करत आहेत. केरळची परिस्थिती मात्र वेगळी आहे. काँग्रेसचे रमेश चेन्नीतला यांच्याकडे भावी मुख्यमंत्री म्हणून पाहिले जात आहे, हे चेन्नीतला महाराष्ट्राचे काँग्रेस प्रभारी आहेत. तिरुअनंतपुरम हे शहर मध्यमवर्गीय, शहरी मतदारांचे केंद्र आहे. गेल्या काही वर्षांत एलडीएफच्या कारभारावर नाराजी वाढली होती . रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि विकासकामांमध्ये दिरंगाई असे आरोप होत होते. मुख्यमंत्री पिनरयी विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफ सरकारवर भ्रष्टाचार आणि स्वकेंद्री धोरणांचे आरोप होते. दुसरीकडे, काँग्रेसने राज्य सरकारवर टीका करताना भाजपला अप्रत्यक्षपणे मजबूत केले. याआधीही १९७७ आणि १९८९ साली काँग्रेसला विरोध या मुद्द्यावर समाजवादी आणि डाव्यांनी भाजपला वाढण्यास मदत केली होती. आज त्याचीच पुनरावृत्ती वेगळ्या प्रकारे होत आहे.

# सामाजिक यज्ञातील उर्जेचा, उत्तुंग व्यक्तिमत्वचा वाढदिवस !



काही व्यक्ती या अशा असतात की, कितीही खडतर प्रवास असला तरी हार न मानता मार्गक्रमण करीत राहतात. यशापयशाची परवा ते कधीच करत नाहीत. फक्त आपले उद्दिष्ट ध्येयाशी प्रमाणिक राहून काम करणे हा त्यांचा स्थायीभाव असतो. त्यापैकी बाळासाहेब खिलारी हे एक नाव मला अधिक भावते.

आव्हानांना सामोरे आव्हान म्हणून कोण उभे राहत असेल तर ते खिलारी सर, पारनेर तालुक्याच्या राजकीय व सामाजकारणात गेल्या अनेक वर्षांपासून हे नाव कायम राहिलेले आहे. सामाजिक यज्ञामध्ये कायम पुढाकार घेणे, आणि जीव ओतून काम करणे ही त्यांची वेगळीच ओळख होय. माजी आमदार स्वर्गीय वसंतराव (दादा) झावरे पाटील यांचे विश्वासू सहकारी म्हणून बाळासाहेब खिलारी सर्वत्र परिचित होते. आता सध्या खासदार निलेश लंके यांचे कट्टर समर्थक व विश्वासू सहकारी म्हणून बाळासाहेब खिलारी सर परिचित आहेत. खासदार निलेश लंके साहेबांच्या प्रत्येक उपक्रमांमध्ये खिलारी सर यांचे योगदान राहिलेले आहे. मग ते कोरोना महामारीच्या काळात लाखो वाटसरुंसाठी सुरू केलेले अन्नछत्र असेल किंवा टाकळी ढोकेश्वर आणि कर्जुलेहार्या सिमेवर राजीव गांधी कॉलेज मध्ये एक हजार बेड क्षमतेचे कोविड केअर सेंटर, आरोग्य शिबीर, मोफत आरोग्य तपासणी व चष्मे वाटप शिबीर असेल खिलारी सरांनी त्यासाठी खुप परिश्रम घेतले. करोनाच्या दुसऱ्या लाटेत भाळवणी येथिल नागेश्वर मंगल कार्यालयात दुसऱ्या वर्षी सुरू करण्यात आलेल्या शरदचंद्रजी पवार आरोग्य मंदिरात हजारो रुग्णांना बरे करण्यामध्ये खासदार निलेशजी लंके यांना यश मिळाले. त्यासाठी बाळासाहेब खिलारी यांनी रात्रंदिवस काम केले. त्यांनी कोरोना रुग्णांची मनोभावे सेवा केली. खासदार महोदयांची संकल्पना सिध्दिस नेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. लोकसहभागातून सुरू करण्यात आलेल्या या कोविड केअर सेंटरची माहिती साता समुद्रापार पोहोचली. देश विदेशात या उपक्रमाचे कौतुक झाले. त्यासाठी पंगती पासून ते गाव पहारे याचे उत्तम नियोजन आणि व्यवस्थापन करण्यात आले.

बाळासाहेब खिलारी सरांचा त्यामध्ये सिंहाचा वाटा होता. मला खासदार निलेशजी लंके यांच्याकडून उर्जा, प्रोत्साहन, पाठबळ नेहमीच मिळते असे खिलारी सर अत्यंत प्रांजळपणे सांगतात. खासदार साहेबांनी फक्त लढ असे सांगितल्यानंतर काम करण्यासाठी शंभर हत्तींचे बळ मिळते असेही ते नेहमी म्हणतात. म्हणजे खासदार निलेश लंके यांच्याशी अत्यंत एकरूप झालेला कार्यकर्ता म्हणजे बाळासाहेब खिलारी सर होय.!

निलेश लंके प्रतिष्ठानचे महाराष्ट्र राज्य व पारनेर तालुका अध्यक्ष म्हणून ते काम पाहत आहेत. शिक्षक नेता म्हणून सुद्धा बाळासाहेब खिलारी यांची वेगळी ओळख आहे. आणि राज्यातील चंदन उत्पादक शेतकऱ्यांचे ते नेतृत्व करत आहेत. खिलारी सरांच्या सौभाग्यवती या टाकळी ढोकेश्वर गावच्या विद्यमान सरपंच आहेत. आणि आता त्या टाकळी ढोकेश्वर गणातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या आहेत. बाळासाहेब खिलारी हे माझ्या आयुष्यातलं अत्यंत हृदयस्पर्शी समिकरण बनलेले आहे. आज त्यामधील एक उत्तुंग व्यक्तिमत्वचा म्हणजेच बाळासाहेब खिलारी सरांचा वाढदिवस त्यानिमित्ताने त्यांना मनापासून खूप खूप शुभेच्छा..!

**- शब्दांकन -**
**वसंत रांधवण, अहिल्यानगर**
**उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य**
**पत्रकार संघ पारनेर**

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबवणार : पंकज आशिया

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२५. सुपा (अहिल्यानगर) :** शेत तिथे रस्ता गाव तिथे समृद्धीचा नारा देत पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी ते नारायणगव्हाण शिव रस्त्यावरून सुरू झालेली शिव पाणंद चळवळ राज्यात ऐतिहासिकपेरू वाटप आंदोलनामुळे लक्षवेधी त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर हायकोर्टाच्या ६० दिवसांत रस्ता देण्याच्या आदेशामुळे न्यायालयीन बळ मिळाल्यामुळे विविध तालुक्यात जिल्ह्यात शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले. सरकारेही शिव पाणंदच्या मागण्यांची दखल घेत विविध मागण्या मान्य केल्या. परंतु त्याची अंमलबजावनी होत नसल्यामुळे पुन्हा मुंबई मंत्रालय येथून चळवळीने नागपूर अधिवेशनात पुरू वाटपचा ईशारा देताच सरकारने तातडीने नव्याने मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची घोषणा करत शासननिर्णय काढला



याच धर्तीवर शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे अहिल्यानगर शासकीय विश्रामगृहावर जिल्हयातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेत अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांना मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची पारदर्शक अंमलबजावनी अहिल्यानगर जिल्ह्यात करावी. या संदर्भात रस्त्यासाठी लागणारी निशुल्क मोजणी आणि पोलिस बंदोबस्त, सर्व शिव पाणंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चित करून मजबुतीकरण करणे, गतिमान पद्धतीने काम करण्यासाठी शेतरस्त्यांसाठी १००% यंत्रसामग्रीचा वापर, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण, दगडी नंबरी लावणे, गाळ, माती, मुरूमासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क आकारू नये, झिरो पेण्डसी अशा विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना चळवळीच्या वतीने देण्यात आले. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी सहानुभुतीपूर्वक संवाद साधत तातडीने सबंधित विभागांना आदेश देण्याचे आश्वासन दिले. त्याचबरोबर जिल्हाभरातील विविध तालुक्यांमधुन आलेल्या प्रत्येक शेतकऱ्याचे निवेदन पाहून स्वतः फोटो काढून संबंधित विभाच्याअधिकाऱ्यांना फोटो पाठवत शेतकऱ्यांची सहानुभुतीपूर्वक संवाद साधत शेतकऱ्यांची मने जिंकली. यावेळी शेतकऱ्यांनी पुष्पगुच्छ देत साहेबांचा सन्मान केला. यावेळी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे पाटील, सुरेश वाळके, रविंद्र खुडे, पोपट शेळके, बाळासाहेब थोरात, सचिन शेळके, अशोक कचरे, संजय साबळे, भाऊसाहेब वाळूंज, बबन गुंड, दशरथ वाळूंज, विठ्ठल निर्मळ, आशाबाई वाघ, उषाताई हुके, कानिफ कदम, प्रशांत चौधरी आदिंसह विविध तालुक्यातील शिवपाणंद चळवळीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पातळी

निवडणूकीत गाठी
ते खालची पातळी
मोकळे झाले वरिष्ठ
ही तर गाव पातळी

सोन्यासारखीचमक
मुर्ती असून पितळी
पक्षश्रेष्ठीचेकाळीज
आतूनअसे चितळी

मोठ्यांची इलेक्शन
बाकीचे उचले तळी
तहानकार्यकर्त्यांना
आटूनजातात तळी

अंगलट आला डाव
कशीअसे गुपचिळी
कापून टाकी सडके
तयार असते विळी

विजयश्री मिळताचं
टिळामिरवताभाळी
श्रेयश्री देऊन टाकी
बिचारीमंडळीभोळी

प्रयोग गुलामा वरती
जहर उतरवता गळी
सोयी नुसार बदलाव
का पध्दत वेगवेगळी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# मंद्रूप येथील शैक्षणिक प्रबोधन शिबिरात ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांचे प्रतिपादन

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२४, सोलापूर :** शिक्षकांनी बदलत्या जमान्यात शिक्षण कसे उपयोगी ठरेल हे पहावे. मुलांना म. गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील समजणार नाहीत. त्यामुळे नव्या पिढीचे भवितव्य तुमच्या हातात आहे. या प्रबोधन शिबिरातून कमळे गुरुजी यांनी माणसं उभी केली. आज काळ बदलत आहे, तरी काळाशी समरस झाले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांनी केले. ते मंद्रूप येथील दी. शि. कमळे गुरुजी शिक्षण संकुलात ४२ वे शैक्षणिक प्रबोधन शिबिर व निर्मलाताई कमळे आदर्श शिक्षिका पुरस्कार वितरणप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कोळी होते.

यावेळी राजा माने म्हणाले, कृषी विद्यापीठाने ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धा परीक्षेची चटक लावली. त्यामुळेच आज ग्रामीण भागात पीएसआय, तहसीलदार असे अधिकारी निर्माण झाले.

यावेळी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत प्राचार्य नरेश बदनोरे म्हणाले, जपान जर्मनीची जडणघडण नवीन शिक्षण धोरणामुळे झाली. त्यानंतर चीन, फिनलँड यासारखे देश सुद्धा शिक्षणामुळे पुढे आले. धर्मसत्तेला छेद देण्याचे काम वैज्ञानिकांनी केले. धर्मसत्तेला बाहेर फेकल्यानंतर राजसत्ता उदयाला आली. राजसत्तेच्या दुर्गुणामुळे पुढे लोकशाहीचा उदय झाला. आता चौथी औद्योगिक क्रांती सुरू आहे. मात्र त्याविषयी काहीही बोलले जात नाही किंवा बोलू दिले जात नाही. आता समाजाला जागृत करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रकाश कोळी म्हणाले, नॉलेज अपडेट करणे आवश्यक आहे. आपण आउटडेटेड होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. कमळे गुरुजी प्राथमिक शिक्षक होते. मात्र त्यांचे विचार जागतिक पातळीचे होते. रानावनातल्या



लोकांना उभारी देण्याचे काम गुरुजींनी केले. यावेळी निर्मलाताई कमळे आदर्श शिक्षिका पुरस्कार नूमवि प्रशाला पुणे येथील उपमुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांना प्रदान करण्यात आला. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव एम. डी. कमळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी केले. तर आभार खजिनदार प्रा.व्ही. के. पाटील यांनी मानले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड संदेश कोळी, उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, सहसचिव प्रा. सुबोध कोळी व विश्वस्त नागेश बिराजदार यांच्यासह संस्थेअंतर्गत असलेल्या सर्व शाळा, कॉलेजचे प्राचार्य व मुख्याध्यापक उपस्थित होते.

व्याख्यान सत्रात प्रा.डॉ. चंद्रकांत चव्हाण सोलापूर जिल्हा शिक्षण क्षेत्रातील शिल्पकार या विषयावर बोलताना म्हणाले, प्राचीन काळापासून भारतात शिक्षणाला महत्त्व आहे. बहुजनांना शिक्षण देण्यासाठी ज्योतिबा आणि सावित्री फुले यांनी काम केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले. हाच विचार पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी नेला. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचे जाळे उभा केले. सोलापूर जिल्ह्यात होटगी मठ, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद, शेठ हिराचंद नेमचंद यांनी शिक्षण संस्था उभी केली. बार्शीमध्ये मामासाहेब जगदाळे यांनी शाळा, महाविद्यालय काढून शिक्षण प्रसार केला.

दक्षिण सोलापूर तालुक्यात कमळे गुरुजींच्या विचारातून शिक्षणाचे जाळे उभा राहिले. इथल्या मुलींना उच्च शिक्षणाचे दार खुले झाले. त्यातून शिक्षणाचा विस्तार झाला.

तिसऱ्या सत्रात डॉ. जयंत करंदीकर यांनी व्यसन व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, मानसिक रुग्ण घराघरात वाढत आहेत. सहनशील त्याच्या अभावामुळे त्यांना वाढतोय. जेवणाला अध्यात्माची जोड दिल्यास जेवण आनंदी राहते. माणसाने किती खाल्ले यापेक्षा त्याला किती पचले महत्त्वाचे त्यावरून आरोग्य ठरते. चांगलं दिसण्यापेक्षा चांगले असणे महत्त्वाचे आहे. सत्राध्यक्ष डॉ सी जी हविनाळे यांनी यथोचित समारोप केला. तदनंतर समारोपप्रसंगी

संस्थेच्या विविध शाळांतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. दिवसभर झालेल्या या शिबिराचा अनुभव पी. एम. कमळे व विजय बिज्जरगी यांनी अनुभव व्यक्त केला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा विजय साळवे व राजकुमार तेली यांनी केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

# थोडक्यात

## कुकडी डावा कालवा आवर्तन आज सुटणार - आ.काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी असून आज शुक्रवार, दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी कुकडी डाव्या कालव्यातून आवर्तन सोडण्यात येणार असल्याची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी दिली. कांद्याच्या दरात झालेली दरवाढ आणि हिवाळी हंगामात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या कांदा लागवडीसाठी वेळेवर पाणी मिळावे.

यासाठी पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केलेल्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. कांदा हंगाम हा पारनेर तालुक्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने, पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. शेतकऱ्यांकडून कुकडी डावा कालवा आवर्तन तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी होत असताना, आमदार दाते यांनी पुढाकार घेवुन जलसंपदा मंत्री व अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे थेट पाठपुरावा केला. या पाठपुराव्याची दखल घेत पालकमंत्र्यांनी कुकडी सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव व कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर यांच्याशी संपर्क साधत तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. कालवा दुरुस्तीची कामे पूर्णत्वाच्या टप्प्यात असून ती पूर्ण झाल्यानंतर आ. दाते सरांशी संपर्क करुन दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी आवर्तन सोडण्याचा निर्णय अंतिम करण्यात आला. सध्या लाभक्षेत्रात कांदा रोपांची लागवड व वाढीचा अत्यंत महत्त्वाचा कालावधी सुरू आहे. या टप्प्यावर पाणी न मिळाल्यास उत्पादन घट, खर्चवाढ आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता होती. मात्र आता आवर्तन सुटणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## श्रद्धेय अटलजी सुसंस्कृत राजकारणाचा दीपस्तंभ - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी हे केवळ एक महान नेते नव्हते, तर ते राष्ट्राच्या आत्म्याशी संवाद साधणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते.



त्यांनी देशाच्या राजकारणाला सुसंस्कृतपणा, सहिष्णुता आणि विचारांची उंची दिली. एकंदरीत अटलजी हे सुसंस्कृत राजकारणाचा दीपस्तंभ असल्याची भावना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली. भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगरच्या जनसंपर्क कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री मनोज पाल, रविंद्र गुरुनुले, सविता दंढारे, भाजप नेते प्रकाश देवतळे, तुषार सोम, नामदेव डाहुले, बलराम डोडाणी, मंडळ अध्यक्ष स्वप्निल डुकरे, रवी जोगी, प्रदीप किरमे, ॲड. सारिका संदुरकर, दशरथसिंह ठाकुर, माजी नगरसेवक सुषमा नागोसे, संजय बोरघाटे, राकेश बोमावार, प्रदीप शास्त्रकार, निलेश बेलखेडे, हर्षल कानमपल्लीवार आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. अटलजींच्या नेतृत्वाखाली भारताने विकासाच्या अनेक ऐतिहासिक टप्प्यांना स्पर्श केला. पोखरण अणुचाचणी, सुवर्ण चतुर्भुज महामार्ग योजना, ग्रामसडक योजना यांसारख्या निर्णयांमुळे देशाची सुरक्षितता आणि दळणवळण व्यवस्था मजबूत झाली. त्यांनी नेहमीच 'राष्ट्र प्रथम' या विचाराला प्राधान्य दिले. राजकारण करताना विरोधकांशीही सन्मानाने संवाद साधण्याची परंपरा अटलजींनी रुजवली. मतभेद असले तरी मनभेद नसावेत, हा त्यांचा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांचे विचार, त्यांची मूल्ये आणि त्यांची राष्ट्रनिष्ठा आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ सारखी आहेत. आज अटलजींच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांना स्मरणात ठेवून समाजहित, लोकहित आणि राष्ट्रहितासाठी काम करण्याचा संकल्प करण्याची गरज असल्याचे यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले.

## आ. मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात चंद्रपूर महानगरपालिका निवडणूक होणार

### आ.मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात मिळेल संघटनेला नवी ऊर्जा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** चंद्रपूर शहर महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनात राबविण्यात येणार आहे. संघटन अधिक सुदृढ करणे आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रिया नियोजनबद्ध व प्रभावीपणे पार पाडणे या दृष्टीने प्रदेश भाजपकडून त्यांना महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यासंदर्भात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अधिकृत नियुक्तीपत्र जाहीर करून या निर्णयाला अधोरेखित केले आहे. आमदार चैनसुख संचेती यांची निवडणूक निरीक्षक म्हणून, माजी खासदार अशोक नेते यांची निवडणूक प्रभारी म्हणून, तर आ. किशोर जोरगेवार यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्त्यांमुळे चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी नियोजनबद्ध, समन्वयित आणि गतिमान अभियान उभारले जाणार आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने काम करणारे आ. सुधीर मुनगंटीवार हे या निवडणुकीचे प्रमुख प्रेरणास्त्रोती ठरणार आहेत. अफाट लोकसंपर्क, कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि जनतेच्या अपेक्षांना न्याय देणारे निर्णयक्षम नेतृत्व अशी त्यांची ओळख आहे.

महानगरपालिका निवडणूक ही केवळ राजकीय स्पर्धा नसून चंद्रपूरच्या पुढील पाच वर्षांच्या विकास आराखड्याचा पाया आहे, असा दूरदर्शी दृष्टिकोन त्यांनी मांडला असून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात संघटनेला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर धडक कारवाई

## ८ टिप्पर जप्त; १ कोटी ६२ लाखांचा मुद्देमाल ताब्यात



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, बुलढाणा :** जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकी विरोधात प्रशासनाच्या धडक कारवाई सुरु आहेत. मलकापूर तालुक्यातील मौजा नरवेल परिसरातील पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ८ टिप्पर व १६ ब्रॉस वाळू जप्त करण्यात आली असून, एकूण अंदाजे १ कोटी ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

याप्रकरणी ८ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या आदेशानुसार आणि उपविभागीय अधिकारी मलकापूर संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व महसूल विभागाच्या संयुक्त पथकाने दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास केली आहे. दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास, पोलीस स्टेशन एमआयडीसी मलकापूर हद्दीतील नरवेल कोटेश्वर मंदिर शिवार येथे पेट्रोलिंग सुरू असताना जमुनापुरी घाटातून मलकापूरकडे शासनाचा महसूल बुडवून अवैध वाळू वाहतूक होत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तहसीलदार व महसूल कर्मचाऱ्यांसह पंचांना सोबत घेऊन नाकाबंदी केली.

नाकाबंदी दरम्यान संशयास्पदरीत्या येणारी ८ टिप्पर वाहने थांबवून तपासणी केली असता, चालकांकडे वाळू वाहतुकीसाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचे आढळून आले. पंचासमक्ष तपासणीमध्ये प्रत्येकी सुमारे २ ब्रॉस वाळू असे एकूण १६ ब्रॉस वाळू (अंदाजे किंमत २ लाख रुपये) तसेच प्रत्येकी अंदाजे २० लाख रुपये किमतीची ८ टिप्पर वाहने जप्त करण्यात आली. अशा प्रकारे वाळू व वाहनांसह १ कोटी ६२ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

या प्रकरणी पो.स्टे. एमआयडीसी दसरखेड भाग-०५, गुन्हा अप. क्र. १७५/२०२५ अन्वये कलम ३०३(२) भान्यासं सह कलम २१(१), २१(२) गौण खनिज अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये मलकापूर येथील ६ जण, नांदुरा आणि मोताळा येथील एका जणाचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या टिप्पर वाहनांचे क्रमांक चक-२८-इइ-६१७४/ २८९५/ ४४१४/ ४१७२/ १२१०/ ८९१०/ ७९३५ / ७३९७ असे आहेत. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर कारवाई यापुढेही सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# रा. फ. नाईक विद्यालय वार्षिक स्नेहसंमेलन २०२५

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२५, (ठाणे) नवी मुंबई :** श्रमिक शिक्षण मंडळ संचालित रा.फ. नाईक विद्यालय प्राथमिक मराठी विभाग आणि एस.आर.नाईक पूर्व प्राथमिक शाळा यांचा एकत्रितपणे 'उमंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम नुकतेच आयोजित करण्यात आला. 'उमंग' म्हणजे उत्साह, आनंद, आशा किंवा उमेद, जो जीवनातील सकारात्मक भावना दर्शवतो. वार्षिक स्नेहसंमेलन- २०२५ चे प्रमुख पाहुणे म्हणून श्रमिक शिक्षण मंडळाचे प्रशासकीय अधिकारी सन्मा. नरेंद्र म्हात्रे उपस्थित होते. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि नटराज पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमप्रसंगी रा. फ. नाईक माध्यमिक व ज्युनि. कॉलेज विभागाचे प्राचार्य रविंद्र पाटील, रा.फ. नाईक इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सुमती सुप्पया, एफ.जी.नाईक सिनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रताप महाडीक, रा.फ. नाईक माध्यमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका सीमा म्हात्रे, एस.आर. नाईक पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका इलेन फर्नांडीस मॅडम, संगणक विभागाच्या प्रमुख कल्पना माळी, के.जी. विभागाच्या सुपरवायजर वृषाली जळगावकर आणि रा.फ. नाईक प्राथमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका राजश्री यादव उपस्थित होत्या.वार्षिक स्नेहसंमेलन - २०२५ ची सुरुवात 'श्रीरामचंद्र कृपाळू' या कथ्थक प्रकारातील स्वागत गीताने झाली. संगणक विभागाच्या वतीने अतिशय तालबद्ध असा नृत्याविष्कार सर्व इयत्तांच्या विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे सादर केला.

एस. आर. नाईक पूर्व प्राथमिक इंग्लिश मिडियम नर्सरी विभागाच्या चिमुकल्या बाल कलाकारांनी त्यांच्या 'स्पिन फ्यूजन' नृत्याने सर्वांचे मन प्रसन्न केले. ज्युनिअर के. जी. च्या कलाकारांनी सादर केलेले 'लव यु जिंदगी' या नृत्याविष्काराने तर प्रेक्षकांची मने जिंकली. सिनिअर के.जी. विभागाने 'राजस्थानी फोल्क नृत्य' आणि 'रंग दे बसंती' हे नृत्य सादरीकरण सादर करून सर्वांना आनंदी केले. रा.फ. नाईक प्राथमिक मराठी विभागाच्या वतीने




'स्वर्गात आकाशगंगा' हा स्वर्गाची अनुभूती देणारा नृत्याविष्कार इयत्ता पहिलीच्या कलाकारांनी सादर केला. टाळ्यांच्या गजरात उपस्थितांनी सर्व कलाकारांचे कौतुक केले. आरोग्यदायी सवयींचे महत्त्व सांगताना खाण्याच्या चांगल्या आणि वाईट दोन्ही सवयींचे वर्णन इयत्ता तिसरीच्या बालकलाकारांनी आपल्या नृत्याविष्कारातून करून सर्वांचे डोळे उघडले तसेच सत्वहीन खाणे न खाण्याची प्रतिज्ञा देखील सर्व उपस्थितांना घ्यायला सांगितली, असे हे 'पोषण आहार' गीत, नृत्य आणि नाट्य यांचा एकत्रित मिलाप असणारे सर्वांचे प्रबोधन करणारे ठरले.

खाणे म्हटलं की ते पिकवणारा शेतकरी आला.

'आम्ही जातीचे शेतकरी' या नृत्याविष्कारातून इयत्ता दूसरीच्या विद्यार्थ्यांनी शेतक-याच्या कष्टमय जीवनाचा परिचय सर्वांना करून दिला. शिवरायांच्या जन्मापासून ते राज्याभिषेकापर्यंतचे शिवचरित्र इयत्ता चौथीच्या कलाकारांनी अल्पावधीत सुंदर आणि अवर्णनीय असे साकारले. उपस्थितांनी देखील टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. अशा रंगतदार, बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ शिक्षक बबन कवर यांनी केले. 'उमंग' स्नेहसंमेलनाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# येडेश्वरी साखर कारखान्याची ऊस गाळपात दमदार कामगिरी

## ५४ दिवसांत ४ लाख मे.टन ऊस गाळप पूर्ण, खा.बजरंग सोनवणेंची माहिती

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२५, केज (बीड) :** येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (ता. केज) येथे सन २०२५-२६ या चालू गळीत हंगामात अवघ्या ५४ दिवसांत तब्बल ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचा महत्त्वाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. कारखान्याचा बारावा गळीत हंगाम सध्या पूर्ण क्षमतेने सुरू असून, नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे गाळपाचे उद्दिष्ट वेगाने साध्य होत आहे, अशी माहिती कारखान्याचे चेअरमन खा.बजरंग सोनवणे यांनी दिली आहे.दररोज सरासरी सुमारे ९ हजार टन ऊस गाळप होत असून, शेतकऱ्यांच्या ऊसाला वेळेवर आणि अडथळेविना गाळप मिळत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गळीत हंगामाच्या सुरुवातीपासूनच काटेकोर नियोजन, यंत्रसामग्रीची तत्पर देखभाल आणि कामगारांचे नियोजन यामुळे गाळपाचा वेग कायम ठेवण्यात कारखाना प्रशासनाला यश आले आहे. ऊस



गाळपाबरोबरच कारखान्यांतर्गत कार्यरत असलेला २६ मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प ही प्रभावीपणे सुरू आहे.

आज अखेर या प्रकल्पातून एकूण १ कोटी ९३ लाख ६४ हजार २०० युनिट वीज निर्मिती करण्यात आली असून, त्यापैकी ७२ लाख ५४ हजार ९०० युनिट वीज महावितरण कंपनीला निर्यात (एक्सपोर्ट) करण्यात आली आहे. त्यामुळे कारखान्याला अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध झाला असून, ऊर्जानिर्मिती क्षेत्रातही येडेश्वरी साखर कारखान्याने आपली क्षमता सिद्ध केली आहे.

कारखान्याच्या कार्यक्षम व दूरदृष्टीपूर्ण व्यवस्थापनामुळे गाळप आणि वीज निर्मिती या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती होत आहे. याचा थेट फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होत असून, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. आगामी काळातही अशीच कामगिरी कायम राखत शेतकऱ्यांचा विश्वास दृढ करण्याचा संकल्प कारखाना प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### डिस्टिलरीत मोठी झेप

डिस्टिलरी विभागाकडील गळीत हंगाम २०२५-२६ चे प्रत्यक्ष उत्पादन दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी चालू होऊन २८३६४ मे.टन सिरप पासून ७९,९७,२०४ ब.ली.आर.एस.चे उत्पादन झालेले आहे. तसेच ५८३४ मे.टन बी हेवी पासून १६,९६,९४० ब.ली.आर.एस असे एकूण आर.एस.९६,९४,१४४ चे उत्पादन झाले आहे. सदर उत्पादित सिरप आर.एस.पासून ६३,८९,९३२ ब.ली. इथेनॉल व बी हेवी आर.एस.पासून २,७४,६०८ इथेनॉल असे एकूण ६६,६४,५४० ब.ली.चे उत्पादन झाले आहे. उर्वरित आर.एस.२६,९६,३७७ लाख लिटर आर.एस.साठा शिल्लक आहे. उत्पादित झालेल्या इथेनॉल पैकी ४९,९५,००० ब.ली.ची ऑईल कंपनीना विक्री झालेली असून आज उर्वरित १६,६९,५४० ब.ली. इथेनॉल शिल्लक आहे.

# रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी - नरहरी झिरवाळ

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, मुंबई :** नववर्षाचे आगमन, उत्सव आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्य आस्थापनांमध्ये तयार होणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ असणे आवश्यक आहे. यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेलमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व असून यासंदर्भात हॉटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे.



तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाईल. यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर मोठी मोहीम हाती घेतली असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले.

'स्वागत नववर्षाचं, संकल्प हॉटेल स्वच्छतेचा' उपक्रमांतर्गत उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार व प्रोत्साहन दिले जाणार आहे. उत्तम स्वच्छता व अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणाऱ्या हॉटेल आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार देण्यात येणार आहेत. जिल्हास्तरावरील पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील, तर राज्य स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या हॉटेल्सचा सन्मान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.मंत्री झिरवाळ यांच्या संकल्पनेतून 'स्वागत नववर्षाचं, संकल्प हॉटेल स्वच्छतेचा' हा विशेष उपक्रम २६ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीत राज्यभर राबविण्यात येत आहे.

या मोहिमेचा सविस्तर अहवाल मंत्री कार्यालयात सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेत 'वंदे मातरम'च्या जयघोषात स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या खापरखेडा येथील वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूलमध्ये २३ व २४ डिसेंबर रोजी वार्षिक स्नेहसंमेलन दिमाखदार सोहळ्यात पार पडले. 'वंदे मातरम' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संपूर्ण कार्यक्रमाची थीम 'वंदे मातरम' ठेवण्यात आली होती.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या प्रतिमेला माल्यार्पण व द्वीप प्रज्वलनाने झाली. या सोहळ्याचे उद्घाटन भाजपा राज्य परिषद सदस्य डॉ. राजीव पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराविमं कर्मचारी शिक्षण संस्थेचे सचिव ईश्वर राऊत होते.याप्रसंगी व्यासपीठावरन खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता सचिन डेग्वेकर, खापरखेडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिश रुमकर, ज्येष्ठ भाजपा नेते रमेश जैन, भानेगाव सरपंच शालिनी चवरे, केंद्र प्रमुख संजय गुंजरकर, प्रशांत जालंदर, संध्या ठाकरे, प्रतिभा खन्नाडे, यामिनी घोडमारे, गणेश चिखले, किशोर बक्सरिया, सुनील जालंदर, प्रकाश साद, विपीन शर्मा, विलास महल्ले, मुख्याध्यापिका मोनाली सुरकर प्रामुख्याने उपस्थित होते. 'वंदे मातरम' ही थीम असलेल्या या स्नेहसंमेलनातून भारताची समृद्ध संस्कृती आणि राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवण्यात आले. यात प्रामुख्याने विविध राज्यातील लोकनृत्य व भारतातील विविध प्रांतांमधील संस्कृती कलेच्या माध्यमातून सादर करण्यात आली. शिवाय 'ऑपरेशन सिंदूर' आणि २६/११ च्या मुंबई हल्ल्यावरील जिवंत नाटिकेने प्रेक्षकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस नृत्य सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळाल्या. उद्घाटन डॉ.राजीव पोतदार यांनी शाळेच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीची प्रशंसा करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मोनाली सुरकर यांनी केले संचालन वेदिका ढगे, प्राजक्ता गोमकाळे, रुबिना शेख व फिरदोष शेख यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक 'वंदे मातरम' गायनाने करण्यात आली. या सोहळ्याला शेकडो पालक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# विकासकांनी वायू प्रदूषण उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करावी - आयुक्त डॉ. शिंदे

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२५, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात असून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी संबधित विभागांची बैठक घेऊन अधिकारी, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर उतरुन अधिक प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते व त्या अनुषंगाने कार्यवाहीला सुरुवात ही करण्यात आलेली आहे. यामध्ये एक महत्वाचा घटक बांधकाम व्यावसायिकांचा असून बांधकाम साईट्स वरील प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजनांची मानक कार्यप्रणाली महानगरपालिकेने जाहीर केलेली आहे. त्याचे काटेकोर पालन सर्व विकासकांकडून करण्यात यावे या करिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. या प्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ७० हून अधिक विकासक व वास्तुविशारद उपस्थित होते.याप्रसंगी आयुक्तांनी नवी मुंबई शहरातील पर्यावरण उत्तम रहावे व येथील हवा गुणवत्ता निर्देशांक नेहमीच चांगला रहावा या करिता प्रामुख्याने बांधकाम व्यावसायिकांनी आपल्या बांधकामाच्या ठिकाणी सर्व प्रकारची प्रदूषण प्रतिबंधात्मक कार्यवाही व उपाययोजना काटेकोरपणे कराव्यात असे सूचित केले.

या प्रसंगी सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण व नगररचनाकार युवराज चव्हाण उपस्थित होते. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी बांधकाम व पुनर्विकासाची कामे सुरु आहेत. सदर कामांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंग यांच्या अनुषंगाने उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेली र्डीचीं जनहित याचिका क्र.३/२०२३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. ११/१२/२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार वायू प्रदूषण कमी करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या ध्वनी प्रदूषण, वायु प्रदूषण व ब्लास्टींग करीता अवलंबवायची मानक कार्यप्रणाली (Standard Operating Procedure - SOP) व बांधकाम प्रकल्पांच्या साईटवर होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाबाबतच्या दंडात्मक कारवाई बाबत दि.०१/०८/२०२४ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत परिपत्रक पारीत करण्यात आले आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश (MMR) करीता उपरोक्त ध्वनी व वायू प्रदूषणाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनाबाबत उच्च न्यायालयामार्फत दि.२८/११/२०२५ रोजी आदेश पारीत करण्यात आलेले आहेत व यावर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम सुरु असलेल्या एकूण ८५ बांधकाम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांची, तुर्भे येथील ठचउ प्लान्टची व महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामांची दि.१३/१२/२०२५ रोजी स्थळ पाहणी केली असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या मानक कार्यप्रणाली (SOP) मधील उपाययोजनांची सर्व बांधकाम साईटवर प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.



त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व विकासक व वास्तुविशारद यांची आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये आयुक्तांनी मा. उच्च न्यायालयात महानगरपालिकेच्या वतीने वायू प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंधासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार विविध उपाययोजना करण्याचे सूचित केले. यानुसार, बांधकाम साईटवर सीसीटिव्ही (उउढत) कॅमेरे तसेच हवेची गुणवत्ता मोजमाप दर्शविणारे डिस्प्ले बसविण्याबाबत बांधकाम परवानगीमध्ये अट नमूद करण्यात येईल. सदर वायू गुणवत्ता मापन यंत्रणा केंद्रीकृत डॅशबोर्डशी एकत्रित करून प्रत्यक्ष वेळेत माहिती संकलन, अहवाल निर्मिती व वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) मर्यादा ओलांडल्यास स्वयंचलित इशारा प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी. या डॅशबोर्डद्वारे नवी मुंबई महानगर पालिका व चझझउ यांना दैनंदिन माहिती उपलब्ध होईल तसेच धूळ निर्माण होणाऱ्या ठिकाणी अटख सेन्सर योग्य ठिकाणी बसविण्यात यावेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) विद्यमान वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्रे (AQMS) व्यतिरिक्त, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक २ चौ.कि.मी. क्षेत्रासाठी १ या प्रमाणात एकूण ५५ वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्रे (AQMS) बसविण्याची प्रक्रिया नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येईल. नवी मुंबई महानगरपालिकेने वायू प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणी बाबत साप्ताहिक माहिती नोंदविण्यासाठी गुगल स्प्रेडशीट (त्रेेसश्रश डॲशरवीहशर्शी) स्वरूपातील तपासणी यादी विकसित करून त्याची लिंक सर्व विभागीय अधिकारी यांना वितरीत केली आहे.

संबंधित विभागांनी सदर तपासणी यादीप्रमाणे कारवाईची माहिती नियमितपणे अद्ययावत करणे बंधनकारक राहील. बांधकाम परवानगी देताना, संबंधित प्रकल्पातील कामगार / मजुरांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी सविस्तर मानक कार्यप्रणाली (SOP) परवानगीच्या अटींमध्ये समाविष्ट करण्यात येईल व त्याचे पालन करणे पुढील प्रमाणपत्रांसाठी पूर्वअट राहील. डजझ चे उल्लंघन आढळल्यास बांधकाम कामे थांबविणे तसेच बांधकाम परवानगी रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल. खोदकाम/ रस्त्याचे खोदकाम करणे/ उत्खनन कामांसाठी परवानगी देताना धूळ नियंत्रण व सुरक्षिततेसाठी धातू किंवा प्लास्टिकचे कडक बॅरिकेड्स उभारणे तसेच निर्माण झालेला मलबा दररोज हटविणे ठेकेदारास बंधनकारक राहील. शक्य असल्यास, उत्खनन सुरू केल्यानंतर २४ तासांच्या आत सर्व कामे पूर्ण करून रस्ता / जागा पूर्ववत करणे आवश्यक राहील.धूळ पुन्हा हवेत उडू नये यासाठी फॉगिंगऐवजी रस्ते धुण्यास प्राधान्य देण्यात येत असून ठाणे–बेलापूर मार्ग, सायन–पनवेल महामार्ग व आम्र मार्ग यांसारख्या प्रमुख रस्त्यांवर दररोज दोन वेळा रस्ते स्वच्छता व धुलाई करण्यात येईल. नवी मुंबई शहरात एत चार्जिंग पॉईंट्स उभारण्याचे नियोजन आहे. बांधकाम व पाडकाम (उ्र) कचरा बेकायदेशीरपणे टाकला जातो तो रोखण्यासाठी शहराच्या प्रवेशद्वारांवर दिवस–रात्र निगराणी ठेवून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल व जनसहभाग प्रोत्साहित केला जाईल.ळ) उड्डाणपुलांखाली विनाकारण उभी केलेली वाहने हटवून आवश्यकतेनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.ळळ) कचरा जाळण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी नियमित तपासणी करून उल्लंघन आढळल्यास दंड आकारण्यात येईल.

हिवाळी हंगामात वाढणारी धूळ व धुरकटपणा लक्षात घेता नवी मुंबई महानगरपालिकेने विशेष रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रण मोहिम राबविण्यास सुरुवात केली आहे.नवी मुंबई महानगरपालिकेने उच्च न्यायालयात सादर केलेल्या सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, सर्व बांधकाम प्रकल्पस्थळी महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या मानक कार्यप्रणाली (डजझ) मधील उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत सर्व विकासकांना सूचित करण्यात आले तसेच विकासकांच्या अडचणी व सूचना विचारात घेऊन आवश्यक उपाययोजनांची पूर्तता सुनिश्चित करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले.

# थोडक्यात

## लोणी भापकर च्या उपसरपंच पदी स्वाती बनसोडे यांची निवड



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२३, बारामती (पुणे) :** बारामती तालुक्यातील राजकीय दृष्ट्यामहत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या लोणी भापकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी स्वाती अविनाश बनसोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळतेउपसरपंच तानाजी पवार यांनीराजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त जागी नूतन उपसरपंचनिवडीसाठी सरपंच गितांजली भापकर यांच्याअध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी स्वाती बनसोडे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणारे ग्रामविकास अधिकारी उज्ज्वला शिंगाडे यांनी बिनविरोध निवड झाल्याचे घोषितकेले.यानंतर नूतन उपसरपंच यांचा सरपंच गितांजली भापकर, बारामती पंचायत समितीचे सदस्य राहुल भापकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रवींद्र भापकर, श्रीकांत भापकर, नंदकुमार मदने, कविता आरडे, आशा भापकर यांच्या सह उपसरपंच पदमनाथ कडाळे, तंटामुक्ती अध्यक्ष मनोज मदने, स्वयंभू सोसायटी चे चेअरमन विजय गोलांडे, ऋषिकेश भापकर, जयराज भापकर, किरण मोरे, बापू माकर, अमोल मदने, सागर बनसोडे, शुभम खोमणे,राजू मदने , सोपान मदने, अतिष मोरे, अभि पवार यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## शांतिकुमार आदिवासी विद्यामंदिरात पालक दिन, बक्षिस वितरण



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२५, तलासरी (पालघर) :** ज्ञानमाता सदन सोसायटी संचालित शांतिकुमार आदिवासी विद्यामंदिर, वरखंडा येथे पालकदिन व बक्षिस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजातील तडफदार युवा अभियंता तथा सामाजिक कार्यकर्ते इंजि. जितू दुमाडा उपस्थित होते. यावेळी शाळेच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

गरीब परिस्थितीतून शिक्षण घेत आदिवासी समाजातून पुढे येत पालघर जिल्ह्यात एक यशस्वी सिव्हिल इंजिनिअर व आर्किटेक्ट म्हणून नावलौकिक मिळवलेल्या इंजि. जितू दुमाडा यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपल्या सिव्हिल इंजिनिअर व आर्किटेक्चर कार्यालयाच्या माध्यमातून १० ते १२ गरजू तरुण सिव्हिल इंजिनिअर्सना विविध ठिकाणी ओळखीच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची उपस्थितांनी विशेष दखल घेतली.

कार्यक्रमात शांतिकुमार आदिवासी विद्यामंदिरच्या सन्माननीय मुख्याध्यापिका श्रीम. मीना सांबर यांनी अभियंता जितू दुमाडा यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन जाहीर सत्कार केला. यावेळी सुभाष वसावलायांनी इंजि. दुमाडा यांच्या उच्च शिक्षणाबाबत सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी उदाहरण ठेवले. पालकदिन व बक्षिस वितरणाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना इंजि. जितू दुमाडा यांनी Education is the ultimate weapon (शिक्षण हे शेवटचे व सर्वात प्रभावी हत्यार आहे आणि ते प्रत्येकाने आत्मसात केलेच पाहिजे. शिक्षण केवळ नोकरी मिळवण्याचे माध्यम नसून त्यातून बुद्धीचा विकास होतो, व्यक्तिमत्त्व घडते आणि समाज परिवर्तनाची दिशा मिळते) असे प्रतिपादन केले. त्यांच्या या विचारांना पालक व विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात विविध शैक्षणिक व सहशालेय स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## रामगोपाल केडिया प्राथमिक विद्यालयात 'वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मुंबई :** अस्मिता संचालित रामगोपाल केडिया प्राथमिक विद्यालयात तीन दिवस चाललेला वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. यामधे विद्यार्थ्यांमधील शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा समन्वय साधणाऱ्या विविध खेळांचे आयोजन व डंबेल्स रुमाल कवायतीचे प्रात्यक्षिके या क्रीडा महोत्सवात करण्यात आले होते. क्रीडा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी श्रीकृष्ण वलेकर (ए.एस.आय.) यांच्या हस्ते झाले. यावेळी संतोष साळकर (खेळाडू) तसेच क्षमा मोंडकर(बालवाडी विभाग), अस्मिता समुपदेशन कक्ष प्रतिनिधी हे मान्यवर उपस्थित होते. पहिल्या दिवशी प्राथमिक विभागातील तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी शंभर मीटर धावणे, चेंडू गोळा करणे शर्यत हे विविध मैदानी घेण्यात आले. दुसऱ्या दिवशी प्रमुख अतिथी श्रीम. जयश्री संख्ये यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला . यावेळी चंद्रशेखर पारखी (अस्मिता संस्था कार्याध्यक्ष) व संतोष फडतरे (माध्यमिक विभाग मुख्याध्यापक) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दिवशी पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी धावणे, अडथळा शर्यत व इंग्रजी अक्षर ओळख या स्पर्धा व रस्सीखेच स्पर्धेची अंतिम फेरी घेण्यात आली. अखेरच्या दिवशी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रचना पवार, शालेय व्यवस्थापन समिती सदस्या तसेच शर्मिला सुरंगळीकर, विजया गोळे पर्यवेक्षिका माध्यमिक विभाग या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

या दिवशी विद्यार्थ्यांच्या इयत्ता तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांची लंगडी स्पर्धेची अंतिम फेरी, पालकांसाठी विशेष स्पर्धा, शिक्षक स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमादरम्यान पालक प्रतिक्रिया सत्रात कविता पाटील व प्रवीण बोरसे यांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक करून अशा क्रीडा महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत व्यक्त केले. या क्रीडा महोत्सवासाठी माध्यमिक विभाग,अस्मिता सेवक वर्ग व अक्षय स्टोअर यांचे विशेष सहकार्य लाभले. तीन दिवस चाललेल्या या क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड, संघभावना, शिस्त व आत्मविश्वास वाढीस लागल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेतील शिक्षकवर्ग, कर्मचारी व व्यवस्थापन समितीच्या सहकार्यामुळे शक्य झाले.